Thursday, November 06, 2014
3:03 PM

# आ. प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालयाकडून मोमीन शेख यांना उपचारासाठी १०००० रूपयांची आर्थिक मदत

पनवेल–दुर्धर आजाराने पिडीत असलेल्या नवीन पनवेल येथिल मोमीन शेख या गरीब कुटूंबातील रूग्णाला आ. प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालयाकडून औषधोपचारासाठी १०००० रूपयांची आर्थिक मदत करण्यात आली.

नवीन पनवेल येथे राहणारे मोमीन शेख यांच्यावर एम.जी.एम. हॉस्पिटल नवी मुंबई, वाशी येथे उपचार सुरू आहेत. त्यांची आर्थिक परिस्थिती गरीबीची असल्याने त्यांना उपचार करणे अवघड बनले होते. त्यामुळे त्यांनी आ. प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालयाकडे आपल्याला आर्थिक मदत मिळावी यासाठी अर्ज केला होता. त्यानुसार आ. प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालयाचे प्रमुख के.जी. म्हात्रे यांनी त्यांच्या मदतीचे प्रकरण सलमान खान यांच्या बिइंग ह्युमन टस्ट यांचेकडे पाठविले. मोमीन शेख यांना आपल्या उपचारासाठी मदत मिळावी यासाठी नगरसेवक राजू सोनी यांनी सलमान खान यांच्या बिईंग ह्युमन टस्ट कडे पाठपुरावा केला. सोनी यांच्या प्रयत्नातून मोमीन शेख यांना उपचारासाठी १०,००० रूपयांची मदत देण्यात आली. मोमीन शेख यांना बिईंग ह्युमन टस्टकडून उपचारासाठीच्या आर्थिक मदतीचा धनादेश त्यांच्या वतीने त्यांची बहिण रूबी शेख यांच्याकडे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सुपुर्द करण्यात आला.

फोटो ओळ–

नवीन पनवेल येथिल मोमीन शेख यांना आ. प्रशांत ठाकूर संपर्क कार्यालयाच्या वतीने बिईंग ह्युमन टस्टकडून उपचारासाठी देण्यात येणाऱ्या १०००० रूपयांच्या आर्थिक मदतीचा धनादेश त्यांच्या वतीने त्यांची बहिण रूबी शेख यांच्याकडे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सुपुर्द करण्यात आला.त्यावेळी बाजूला कार्यालयाचे प्रमुख के .जी. म्हात्रे.